MHGA070003632026

# अहेरी येथील प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी, अहेरी
## श्री. शाहिद साजीदुज्जामॉ एम.एच. यांच्या न्यायालयांत

सं. फौजदारी खटला क्र.२०६/२०२६
सरकार—वि.—नानु उर्फ बाबुराव पोट्टी पोरतेट
**निशाणी —३**

| | | |
|---|---|---|
| | **आरोपांचा आशय व तपशील** | |
| **१.** | **गुन्हा घडला तारीख** | दि.३१.०१.२०२६ रोजी, वेळ १५.१५ वाजता मौजा— आलापल्ली, तह. अहेरी, तालुका अहेरी, जि. गडचिरोली. |
| **२.** | **खबर दिल्याची तारीख** | दि. ३१.०१.२०२६ |
| **३.** | **खबर देणाऱ्याचे नांव** | पुजा पाटील, म.पो.शि. पोलीस स्टेशन, अहेरी, तह. अहेरी, जिल्हा—गडचिरोली. |
| **४.** | **आरोपीचे नांव** | **नानु उर्फ बाबुराव पोट्टी पोरतेट,** वय २४ वर्षे, व्यवसाय—वाहनचालक राहणार— फुसकपल्ली, तालुका—अहेरी, जिल्हा—गडचिरोली. |
| **५.** | **आरोपीत गुन्हे** | |
| | ज्याअर्थी, उपरोक्त दिवशी, वेळी व ठिकाणी, तुम्ही उपरोक्त ठिकाणी तुमचे वाहन धोकादायक स्थितीत इतरांना अडथळा होईल किंवा इजा होईल असे मौजा आलापल्ली, तह. अहेरी, येथे रोडवर उभे केले, त्याअर्थी तुम्ही, **भारतीय न्याय संहिता, २०२३ च्या कलम २८५** प्रमाणे गुन्हा केला असा तुमच्यावर आरोप आहे. | |
| **तारीख:** १२.०३.२०२६ | | **समक्ष** |

Digitally signed by SAJIDUZZAMAN SHAHID
Date: 2026.03.13 11:16:59 +0530

**(शाहिद साजीदुज्जामॉ एम.एच.)**
न्यायदंडाधिकारी प्रथम श्रेणी, अहेरी

| | |
|---|---|
| | **आरोपीचे प्रतिकथन/कबुली** |
| **प्रश्न क्र.१** | तुम्हाला दोषारोपांचा आशय समजला काय? |
| **उत्तर** | होय |
| **प्रश्न क्र.२** | तुम्हाला पोलीस कागदपत्रांच्या नकला मिळाल्यांत काय? |
| **उत्तर** | होय |
| **प्रश्न क्र.३** | तुम्हाला विधी सेवा केंद्राकडुन विधीज्ञ सेवा हवी आहे काय? |
| **उत्तर** | नाही |

| | |
|---|---|
| **प्रश्न क्र.४** | तुम्हाला आरोपीत गुन्हे कबुल आहेत काय? |
| **उत्तर** | होय मला गुन्हा कबुल आहे |
| **तारीख:** १२.०३.२०२६ | **समक्ष** |
| | Digitally signed by SAJIDUZZAMAN SHAHID Date: 2026.03.13 11:17:02 +0530 |
| ............................. | **शाहिद साजीदुज्जामॉ एम.एच.** |
| आरोपी ची सही/अंगठा | न्यायदंडाधिकारी प्रथम श्रेणी, अहेरी |

## न्यायनिर्णय/आदेश

(आज तारीख १२.०३.२०२६ रोजी पारित)

१. या खटल्यातील आरोपी आज हजर असुन त्याला मी उपरोक्त गुन्ह्याचा आशय (**निशाणी ०३**) स्पष्टपणे मराठीत समजावुन सांगितला आहे.

२. आरोपीने ठामपणे व स्पष्ट शब्दांत त्याचेवरील आरोप मान्य केला आहे. तशी पुरसिस त्याने दाखल केली असुन ती निशाणी ०२ ला आहे. आरोपी कुठल्याही अगर कोणाच्याही दबावाविना गुन्हा कबुल करीत आहे याची मी खात्री केली आहे.

३. सबब, मी आरोपीचे गुन्ह्याबाबत कबुलीचे प्रतिकथन स्विकारुन आरोपीला भारतीय न्याय संहिता, २०२३ च्या कलम २८५ प्रमाणे दंडनिय कलमांसाठी दोषी मानत आहे.

४. या गुन्ह्यासाठी जास्तीत जास्त रु.५,०००/— द्रव्यदंड निर्धारित केलेला आहे. आरोपीने केलेल्या कथनांचा विचार करता आणि कमाल शिक्षेची मर्यादा पाहता, माझ्या मते, पुढील आदेश यथायोग्य आहे.

### आदेश

1) आरोपी **नानु उर्फ बाबुराव पोट्टी पोरतेट** यांना भारतीय नागरिक सुरक्षा संहिता, २०२३ चे कलम २७५ नुसार भारतीय न्याय संहिता, २०२३ च्या कलम २८५ प्रमाणे दंडनिय गुन्ह्यासाठी दोषी धरण्यांत येत आहे.

2) आरोपीने या गुन्ह्याबाबत **रुपये ५,०००/— (अक्षरी पाच हजार मात्र) इतका द्रव्यदंड अदा करावा,** अशी शिक्षा त्यांना फर्माविण्यात येत आहे. दंड न भरल्यास आरोपीने दहा दिवस साधी कैद भोगावी असेही फर्माविण्यात येत आहे.

3) प्रकरण संपले.

Digitally signed by SAJIDUZZAMAN SHAHID
Date: 2026.03.13 11:17:06 +0530

**(शाहिद साजीदुज्जामॉ एम.एच.)**

**तारीख :** १२.०३.२०२६

न्यायदंडाधिकारी प्रथम श्रेणी, अहेरी